**संच : ब**

# शिक्षकांसाठी सूचना आठवी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

**इयत्ता - आठवी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ५०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) इतिहास | २) पैलवान |
| ३) सर्वजण | ४) प्रवेश |
| ५) चित्रकला | ६) कंगवा |
| ७) पक्कड | ८) सत्कार |
| ९) राष्ट्रभवन | १०) पॅरिस |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**
हा प्रश्न तपासताना काही बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'पैलवान' ऐवजी 'पयलवान' किंवा 'सत्कार' ऐवजी 'सतकार'/'सक्तार' असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४) हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न २) ब)** नदी (गुण १)

**प्रश्न ३) क)** डोंगरदऱ्यांतून (गुण २)

**प्रश्न ४)** गटारे, अशुद्‌ध पाण्याचे नाले, माणसांनी टाकलेली घाण यांमुळे नदीचे पाणी दूषित झाले. (स्वभाषेतील उत्तरे स्वीकारावीत.) (गुण २)



*Runa Graphics\\Com1-pc\f\Question paper\4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instructions\7) Std 8th Sanch B\Proof-III\19-06-2017\V/S*

## संच : ब

**प्रश्न ५ ते ७) हा उतारा मनात वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ५) क)** मोरूमामांमुळे (गुण १)

**प्रश्न ६) ब)** ज्ञान हे पुस्तकात असते पण त्याचा प्रत्यय प्रत्यक्ष जीवनात घ्यायचा असतो. (गुण २)

**प्रश्न ७)** डोंबाऱ्यासारखे काठीवर चालणे, कुस्ती, बॅडमिंटन व क्रिकेट. (गुण २)

**प्रश्न ८ ते १०) ही कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ८) क)** दूधदुभतं, तूप, लोणी (गुण १)

**प्रश्न ९)** पै-पाहुण्यांसाठी माय दिवसरात्र खपायची. (गुण २)

**प्रश्न १०)** जल्लोषाने भजन कीर्तन करत आख्खी रात्र जागत. (गुण २)
(अशा आशयाचे उत्तर स्वीकारावे.)

**प्रश्न ११ ते १३) हा लेख वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**प्रश्न ११) ब)** मार्च (गुण १)

**प्रश्न १२) अ)** स्वत:ची काळजी घेऊन नियमित अभ्यास करणे. (गुण २)

**प्रश्न १३)** परीक्षेच्या वेळी आपण एकदम अभ्यास करतो यामुळे जेवण अवेळी होते. जास्त जागरण होते. मग आपण आजारी पडतो. (गुण २)

**प्रश्न १४ ते २२) खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.**

**प्रश्न १४) क)** सत् + आचार (गुण १)

**प्रश्न १५)** अत्यानंद (गुण १)

**प्रश्न १६)** चांदणीने लांडग्याशी झुंज देताना जीव पणास लावला. (गुण १)

**प्रश्न १७)** करुणा, कुणाल, प्रवीण, रिमा (सर्व शब्द योग्य क्रमाने लिहिल्यास एक गुण) (गुण १)

**प्रश्न १८)** मी म्हटलं, ''एक अतिशय कठीण प्रश्न विचारा.'' (गुण १)
(एकेरी अवतरण चिन्हाऐवजी दुहेरी अवतरण चिन्ह)

**प्रश्न १९)** पुस्तका (गुण १)

**प्रश्न २०)** क्रियाविशेषण - भरभर (गुण २)

वाक्य - कुणाल खूपच <u>हळूहळू</u> चालत गेला.

(क्रियाविशेषण ओळखणे एक गुण आणि ते वापरून तयार केलेल्या वाक्यास एक गुण.)

(क्रियाविशेषणाचा कोणताही उपप्रकार लिहिला तरी एक गुण द्यावा.)



*Runa Graphics\\Com1-pc\f\Question paper\4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instructions\7) Std 8th Sanch B\Proof-III\19-06-2017\V/S*

## संच : ब

**प्रश्न २१)** सर्वांनी फातिमाचे अभिनंदन केले. (गुण १)

**प्रश्न २२)** मधू मित्रांसोबत बागेत खेळत होता. त्यापैकी कोणीतरी पाने-फुले तोडली होती. माळीकाकांनी सर्वांना बोलावले. मुले जायला घाबरत होती. पण मधू जायला तयार होता. त्याच्या मनात होते की कर नाही त्याला डर कशाला?

**प्रश्न २३) तुझ्या शाळेत भरविण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनाचा अहवाल लिही.** (गुण ५)

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा विषयाला सोडून केलेले असंबद्ध लेखन किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | सुट्या सुट्या वाक्यांचे किंवा काही शब्द बदलून वाक्यांचे परत परत केलेले लेखन. |
| २ | अहवाल स्वरूपात लेखन नाही. मात्र दिलेल्या विषयांपैकी एका विषयावर लेखन करण्याचा प्रयत्न.<br>• वाक्यरचना विस्कळित.<br>• मुद्द्यांचा नेमकेपणा नाही. |
| ३ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाक्यरचना बऱ्यापैकी नीट आहे.<br>• लेखन तुटक तुटक आहे. एका विषयाकडून दुसऱ्या विषयाकडे जाताना सुसंगतपणा दिसत नाही.<br>• घटनांचा उल्लेख मर्यादित शब्दांत केलेला आहे. |
| ४ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन आहे.<br>• मर्यादित मुद्दे नेमक्या शब्दात मांडले आहेत.<br>• लेखनात काही ठिकाणी सुसंगतपणा आढळतो.<br>• घटनांचा उल्लेख थोडा विस्ताराने केला आहे. |
| ५ | विषयाचा एकत्रित विचार करून अहवाल स्वरूपात लेखन केले आहे.<br>• लेखन सुसंगत झाले आहे.<br>• विषयाला धरून मुद्दे नेमक्या शब्दात मांडले आहेत.<br>• घटनांचा विस्तार, तपशिलाचे बारकावे नेमक्या शब्दात मांडल्याने लेखन प्रभावी झाले आहे.<br>• अहवालाची रचना नीट झाली आहे. (उदा. अहवालाची सुरुवात, कार्यक्रमाचा तपशील, अहवालाचा शेवट) |



*Runa Graphics\\Com1-pc\f\Question paper\4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instructions\7) Std 8th Sanch B\Proof-III\19-06-2017\V/S*

## संच : ब

**प्रश्न २४) खाली एक घटना दिली आहे. त्यावर तुझे मत व्यक्त कर.** (गुण ५)

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा विषयाचा संदर्भ न घेता केलेले असंबद्ध लेखन. |
| १ | दिलेल्या विषयाचा विचार न करता सुट्या सुट्या वाक्यांचे लेखन. |
| २ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार केला आहे.<br>• काही ठिकाणी संदर्भ वापरून लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे.<br>• वाक्यरचना नीट नाही. |
| ३ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार करून मत मांडल्याचे दिसते.<br>• लेखनाची रचना विस्कळीत आहे, लेखनापूर्वीचे नियोजन दिसत नाही.<br>• लेखनाचा शेवट पूर्ण केलेला नाही. |
| ४ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार केला आहे.<br>• दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार करून मत मांडल्याचे दिसते.<br>• मत मांडताना लेखनाची ढोबळ रचना केलेली आहे.<br>• मत व्यक्त करताना सुरुवात व शेवट आहे.<br>• वाक्यरचना काही ठिकाणी विस्कळीत आहे.<br>• स्वत:चे मत व्यक्त करताना काही ठिकाणी संदर्भ सुटल्यामुळे लेखन तुटक तुटक वाटते. |
| ५ | • दिलेल्या विषयावर सखोल विचार करून मत मांडल्याचे दिसते.<br>• मत मांडताना लेखनाची एक विशिष्ट रचना केलेली आढळते. लेखनापूर्वीचे नियोजन दिसते.<br>• वाक्यरचना नीट आहे.<br>• स्वत:चे मत व्यक्त करताना सुसंगत सुरुवात व शेवट आहे, त्यामुळे लेखन ओघवते वाटते.<br>• लिहिताना आजूबाजूच्या उदाहरणाचे दाखले दिल्याने लेखन प्रभावी वाटते.<br>• शेवट करताना सकारात्मकरित्या घटना कशी हाताळता येऊ शकते याचे थोडक्यात स्पष्टीकरण आले आहे. |



*Runa Graphics\\Com1-pc\f\Question paper\4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instructions\7) Std 8th Sanch B\Proof-III\19-06-2017\V/S*

## संच : ब

**प्रश्न २५) तुझ्या आवडत्या कवीने तुझ्या शाळेच्या बालकवी-संमेलनाला यावे म्हणून पत्र लिही.**

(गुण ५)

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या संदर्भाचा विचार न करता केलेले असंबद्ध लेखन. |
| १ | दिलेल्या विषयाचा विचार करून वाक्यांचे सुटे सुटे लेखन. |
| २ | • दिलेल्या विषयाचा एकत्रित विचार करून लेखन केले आहे; पण<br>• पत्र स्वरूपात लेखन नाही.<br>• वाक्यरचना नीट नाही.<br>• लिहिताना विस्तारीत तपशील दिलेला नाही, विषयाची मांडणी काहीच शब्दांत केलेली आहे. |
| ३ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र स्वरूपात लेखन करण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• विषयाचा आशय लक्षात येईल असे मुद्दे मांडलेले आहेत.<br>• लिखाणात सलगता, सुसंगतपणा नाही, पत्राचा आणि वाक्यांचा प्रवाह तुटक तुटक वाटतो.<br>• पुस्तकातील घटनेचा फक्त उल्लेख केला आहे. तपशील नाही. |
| ४ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र स्वरूपात लेखन केले आहे.<br>• विषयाला धरून पत्राची सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• पुस्तकातील घटनेचा तपशील सुसंगतपणे मांडला आहे.<br>• घटना का आवडली याबद्दल काहीही लिहिलेले नाही. |
| ५ | • दिलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन पत्र स्वरूपात लेखन केले आहे.<br>• पत्राला सुसंगत सुरुवात आणि शेवट आहे.<br>• पुस्तकातील घटनांचा किंवा आशयाचा संदर्भ घेतला आहे.<br>• सदर संदर्भ का आवडला याबद्दल लिहिले आहे. |



*Runa Graphics\\Com1-pc\f\Question paper\4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instructions\7) Std 8th Sanch B\Proof-III\19-06-2017\V/S*

**संच : ब**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :**

मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी तुला काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

**आज शाळेचा पहिला दिवस. शाळेचा परिसर स्वच्छ आणि सुंदर दिसत होता. शाळेच्या मुख्य दरवाजापाशी शिक्षकांनी सुंदर रांगोळी काढली होती. सर्व शिक्षक गुलाबपुष्प देऊन आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करत होते. इयत्ता दुसरी व तिसरीचे विद्यार्थी पहिलीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गात नेऊन सोडत होते. पहिलीचा वर्ग रंगीबेरंगी पताकांनी, चित्रांनी सजवलेला होता. इतक्यात परिपाठाची घंटा झाली. सर्व मुले परिपाठासाठी रांगेत उभे राहिली. राष्ट्रगीतानंतर गावकऱ्यांच्या हस्ते पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप करण्यात आले.**

**चौथीच्या विद्यार्थ्यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केल्यानंतर सर्व विद्यार्थी रांगेने आपापल्या वर्गात गेले. वर्गात गेल्यानंतर विद्यार्थ्यांनी एकमेकांना सुटीत केलेली धमाल सांगितली.**



*Runa Graphics\\Com1-pc\f\Question paper\4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instructions\7) Std 8th Sanch B\Proof-III\19-06-2017\V/S*

# संच : ब

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही. वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**गुण योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २) पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप कोणाच्या हस्ते करण्यात आले?** (१) (ब)

अ) मुख्याध्यापकांच्या

ब) गावकऱ्यांच्या

क) शिक्षकांच्या

**तोंडी प्रश्न ३) शाळा प्रवेशोत्सवाची तयारी कशाप्रकारे करण्यात आली होती?** (२)

(शाळा परिसर स्वच्छ, सुंदर, रांगोळी, वर्गसजावट, पताका, चित्रे, गुलाबपुष्प देऊन स्वागत अशा आशयाचे उत्तर स्वीकारावे.)

**तोंडी प्रश्न ४) शाळेतील मुलं एकमेकांना सहकार्य करीत होती का? हे तुला कशावरून कळले?** (२)

(होय. दुसरी, तिसरीच्या विद्यार्थ्यांनी पहिलीच्या मुलांना वर्गात नेऊन बसवले, चौथीच्या विद्यार्थ्यांनी खाऊ वाटप केले अशा आशयाचे उत्तर स्वीकारावे.)

■■■



*Runa Graphics\\Com1-pc\f\Question paper\4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Teacher Instructions\7) Std 8th Sanch B\Proof-III\19-06-2017\V/S*